पशुआरोग्य

# जनावरांमधील प्रजननासंबंधित समस्या आणि त्यांचा प्रतिबंध




**डॉ. प्रशांत माने**
(मो.नं. ८३७९९३०९९३)
**डॉ. सय्यद अब्दुल मुजीब**
**डॉ. तोहीद अहेमद शफी**
**डॉ. महारूद्र सानप**
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी




पशुपालक दुग्ध व्यवसाय करताना विविध समस्यांवर मात करून आपला व्यवसाय यशस्वी करतात. पशुपालकांनी शास्त्रशुध्द पध्दतीने प्रजनन व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे. याकरिता त्यांना दुधाळ जनावरांच्या प्रजननाशी निगडित आजारांची माहिती असणे आवश्यक आहे, कारण त्याचा थेट सबंध दूध उत्पादनाशी असतो.

पशुपालकांना दुधाळ जनावरांच्या प्रजननाशी निगडित आजारांची माहिती असणे आवश्यक आहे, कारण त्याचा थेट सबंध दूध उत्पादनाशी असतो. या विविध आजारांची माहिती खालीलप्रमाणे–

## १. वांझपणा

जनावर वांझ राहते, म्हणजे ते गाभण राहत नाही. यामुळे जनावरांचा भाकड काळ वाढतो. आपल्या देशात दुधाळ जनावरांमध्ये वांझपणा ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. वांझपणाचे दोन प्रकार आहेत– तात्पुरता व कायमचा वांझपणा. जनावरांमध्ये तात्पुरत्या वांझपणाचे प्रमाण जास्त असून, जनावरास संतुलित आहार नसणे, गर्भाशयात रोगजंतूचा प्रादुर्भाव होणे, संप्रेरकांची कमतरता, वातावरणातील व आजारांचा ताणतणाव आदी कारणांमुळे हा वांझपणा होतो. कायमचा वांझपणा हा प्रामुख्याने आनुवंशिक दोषांमुळे होतो.

**लक्षणे** : अनियमित माज, कालवडी लवकर माजावर न येणे, अशक्त असणे, गाभण न राहणे, सतत उलटणे, गर्भाशयाचे आजार, गर्भाशयातून अधिक प्रमाणात, अ–सामान्य स्त्राव येणे, गर्भाशयाची पूर्ण वाढ न होणे.

**उपचार** : जनावरांमध्ये असलेला तात्पुरता वांझपणा योग्य प्रजनन व्यवस्थापनामुळे बरा होतो. विशेष करून गर्भाशयाचे आजार असल्यास तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने त्वरित औषधोपचार करावा. कायम स्वरूपाचा वांझपणा असलेले जनावर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने कळपातून कमी करावे.



**प्रतिबंधात्मक उपाय** : पशुपालकांनी तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने सुलभ प्रजनन व्यवस्थापन, नियमितपणे गर्भाशयाची सखोल तपासणी व लसीकरण करावे. जनावरांस उत्पादन क्षमतेनुसार संतुलित व पौष्टिक पशुआहार द्यावा, त्यामुळे जनावर अशक्त किंवा लठ्ठ होणार नाही तसेच



संप्रेरकांचे स्त्रवण योग्य प्रकारे होऊन प्रजननक्रिया सुलभ होईल.

## २. मायांग बाहेर येणे

दुधाळ जनावरांमध्ये मायांग हे प्रसूतिपूर्व किंवा प्रसूतीनंतर बाहेर येऊ शकते, प्रसूतीनंतर मायांग बाहेर येण्याचे प्रमाण जास्त आहे. प्रसूतीनंतर वार अडकल्यामुळे, संप्रेरक, क्षारांच्या कमतरतेमुळे अथवा इस्ट्रोजन हे संप्रेरक असलेला चारा खाल्ल्यास, गर्भाशयात जंतूंचा संसर्ग होणे, गाय अडलेली असल्यास किंवा गर्भाशयाला इजा होणे, हगवण लागणे. मायांग बाहेर येणे हा दोष जन्मजात देखील असू शकतो. गाभण काळाच्या शेवटच्या महिन्यात जर गाय खाली बसली तर पोटाच्या व गर्भाशयाच्या दाबामुळे गायीच्या कमरेचे स्नायू कमकुवत बनतात व मायांग बाहेर येऊ शकते.

**लक्षणे** : गर्भाशयाची पिशवी योनीवाटे बाहेर येणे. बाहेर आलेल्या मायांगातून रक्तस्त्राव होणे. मायांगाबरोबर मूत्राशयसुध्दा बाहेर येणे. गायीची भूक मंदावणे, गाय अस्वस्थ होणे.

**उपचार** : मायांग बाहेर आल्यास पशुपालकांनी ते मध्ये ढकलण्याचा प्रयत्न करू नये, उपचारासाठी तज्ञ पशुवैद्यकाला बोलवावे. पशुवैद्यक

येईपर्यंत खबरदारीचे उपाय पशुवैद्यकाच्या सल्ल्यानेच करावेत.

**प्रतिबंधात्मक उपाय :** प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गाभण जनावरास प्रसूतिपूर्व व प्रसूतीनंतर दररोज नियमितपणे उत्पादनक्षमतेनुसार संतुलित व पौष्टिक आहार द्यावा. प्रसूतीनंतर वार अडकल्यास पशुवैद्यकाच्या सहाय्याने त्वरित औषधोपचार करावा.

### ३. जनावर अडणे

प्रसूतीच्या वेळेस वासरू बाहेर येण्यास अडचण होणे यास जनावर अडणे असे म्हणतात. जनावराचा योनिमार्ग लहान असणे, गर्भाशयास पीळ बसणे, प्रसूतीच्या कळा न देणे, गर्भाशयाचे मुख अर्धवट किंवा न उघडणे, वासरू नैसर्गिक स्थितीत नसणे तसेच गाभण जनावरास शेवटच्या महिन्यामध्ये पौष्टिक व समतोल आहार न मिळणे इत्यादी कारणांमुळे प्रामुख्याने जनावर अडते.

**लक्षणे :** वासराच्या शरीराचे काही भाग बाहेर आलेले दिसणे, कळा देणे, भूक मंदावणे, बेचैन होणे वगैरे. तसेच बऱ्याच वेळेस जनावर अडल्यास बाहेरून लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने जनावरांच्या गर्भाशय व योनिमार्गाची सखोल तपासणी करावी.

**उपचार :** प्रसूतीच्या वेदना सामान्य असतील पण प्रसूतीस अधिक वेळ लागत असेल तर पशुपालकांनी आपले जनावर अडले आहे, असे समजावे व त्वरित तज्ञ औषधोपचारासाठी पशुवैद्यकाला पाचारण करावे.

**प्रतिबंधात्मक उपाय :** गाभण जनावरास शेवटच्या महिन्यामध्ये पौष्टिक व समतोल आहार तसेच दररोज चालण्याचा व्यायाम द्यावा. मागच्या प्रसूतीच्या वेळेस जनावर अडल्यास चालू प्रसूतीच्या वेळेस विशेष काळजी घ्यावी. पशुपालकांनी जनावर अडल्यास मादीच्या गर्भाशयात हात घालून वेळ वाया घालवू नये किंवा वासराचा बाहेर आलेला शरीराचा भाग ओढू नये. असे केल्यास जनावर व वासरू दगावण्याची दाट शक्यता असते.

### ४. माजावर न येणे

दुग्ध व्यवसायाचे यश हे पूर्णपणे जनावर नियमित माजावर येऊन त्याची गर्भधारणा होण्यावर अवलंबून असते. जनावर व्यायल्यानंतर नियमितपणे माजावर न आल्यास ते 'तात्पुरता वांझपणा' या प्रकारात मोडते. शरीरातील काही संप्रेरकांच्या असमतोलामुळे, जनावर व्यायल्यानंतर वार अडकल्यास, जनावर वयात येण्याच्या पूर्वी किंवा आल्यानंतर जनावरास संतुलित व पौष्टिक आहाराच्या कमतरतेमुळे हे घडू शकते. जनावराची शरीरप्रकृती जर अशक्त व पूर्णपणे वाढ झालेली नसेल तर असे जनावर माजावर येत नाही. जनावराला जननेंद्रियांचे रोग असणे- उदा. बीजांडावर विकृती असेल, पोट असेल, पोटात जंत यामुळे देखील



जनावर माजावर येण्यास विलंब होतो.

**लक्षणे :** जनावर माजावर न येणे, अशक्त असणे, वजन कमी असणे, आजारी असणे, गर्भाशयातून अ-सामान्य, अधिक प्रमाणात स्त्राव येणे, गर्भाशयाच्या बीजांडावर विकृती असणे.

**उपचार :** जनावरांच्या या आजाराची लक्षणे आढळल्यास त्वरित तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने औषधोपचार करावेत.

**प्रतिबंधात्मक उपाय :** तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने जनावरांच्या नियमितपणे गर्भाशयाची तपासणी व लसीकरण करावे. जनावरास दररोज उत्पादनक्षमतेनुसार संतुलित व पौष्टिक पशुआहार द्यावा. जनावरास नियमितपणे पशुवैद्यकाच्या सल्ल्याने खनिज मिश्रण व जंतनाशक औषधे द्यावीत. जनावरास काही आजार असल्यास पशुवैद्यकाकडून त्वरित औषधोपचार करून घ्यावा. ■